

एक प्रज्ञावंत...
एक तत्ववेत्ता...
एक विचारवंत...
एक कडवा देशभक्त...
बहुविध ज्ञानाचा ज्ञानकोश...
इतिहासाचा डोळस अभ्यासक...
'दुर्गमहर्षी', 'सह्याद्रीपुत्र' या उपाधींनी गौरविलेले...
**श्री. प्रमोद मारुती मांडे**
यांचे अनोखे व्यक्तीमत्व उलगडण्याचा हा अल्पसा प्रयत्न...

समग्र प्रमोद मांडे

संपादक : श्री. अनिकेत अंकुश यादव

# समग्र प्रमोद मांडे



संपादक
श्री. अनिकेत अंकुश यादव

# समग्र प्रमोद मांडे

## संपादक : श्री. अनिकेत अंकुश यादव




'दुर्गमहर्षी', 'सह्याद्रीपुत्र'

## श्री. प्रमोद मारुती मांडे

यांचा जीवनपट उलगडणारा ग्रंथ...

**या ग्रंथामधील समाविष्ट बाबी :**

* रंगीत आणि कृष्णधवल अशा २ प्रकारांत उपलब्ध.
* साईज – लेटर (८.५' बाय ११') । ७०० पाने ।
  पुठ्ठा बायंडींग (हार्ड बाऊंड)
* १५०+ श्री. मांडे यांनी लिहीलेले छोटे/मोठे लेख.
* २४ चरित्रात्मक लेख.
* ५००+ वृत्तपत्रात आलेल्या बातम्या/लेख/कात्रणे.
* १०००+ प्रदर्शने व विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रे.

---


संपर्क :– श्री. अनिकेत यादव, ४१७, शुक्रवार पेठ, शिवाजी रोड,
खडक पोलीस स्टेशन समोर, पुणे ४११००२. मोबा. 7588291483

# समग्र प्रमोद मांडे

‘दुर्गमहर्षी’ ‘सह्याद्रीपुत्र’
श्री. प्रमोद मारुती मांडे
यांचा जीवनपट उलगडणारा ग्रंथ

या ग्रंथामधील समाविष्ट बाबी :

१५०+ श्री. मांडे यांनी लिहीलेले छोटे/मोठे लेख.
२४ चरित्रात्मक लेख.
५००+ वृत्तपत्रात आलेल्या बातम्या/लेख/कात्रणे.
१०००+ प्रदर्शने व विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रे.

* संकलक व संपादक *

श्री. अनिकेत अंकुश यादव

# समग्र प्रमोद मांडे

*Samagra Pramod Mande*

© संपादक :– श्री. अनिकेत अंकुश यादव

**Editor :- Mr. Aniket Ankush Yadav**

**प्रथमावृत्ती : दि. १८ मे २०२५, शिवशक ३५१**

**प्रकाशक –** **अनिकेत एंटरप्रायझेस, श्री. अनिकेत अंकुश यादव,**
४१७, शुक्रवार पेठ, खडक पोलीस स्टेशन समोर,
शिवाजी रोड, पुणे ४११००२, महाराष्ट्र, भारत.
संपर्क क्र. ७५८८२९१४८३, ९८२२७४३२४४.
Email - aniketyadav84@gmail.com

**मुखपृष्ठ व मांडणी – श्री. माणिक काळे**

**मूल्य :– रु. ६,०००/– (रंगीत, विशेष आवृत्ती)**
**रु. २,५००/– (कृष्णधवल)**

सर्व हक्क राखीव. या पुस्तकातील कोणताही मजकूर किंवा छायाचित्रांचे कोणत्याही माध्यमात पुनःप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी संपादकाची लेखी पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

‘दुर्गमहर्षी’ ‘सह्याद्रीपुत्र’ प्रमोद मारुती मांडे
यांच्या आयुष्याचा हा जीवनप्रवास...
‘आदिशक्ती आई तुळजाभवानी’ आणि
महाराष्ट्राचे मर्दानी दैवत ‘छत्रपती शिवाजी महाराज’
यांच्या चरणी सादर अर्पण...

## ❊ संपादकाचे मनोगत ❊

सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या आणि भारतभूमीवर अथांग पसरलेल्या गडकिल्ल्यांची तब्बल ४० वर्षे अखंड भ्रमंती करणाऱ्या 'दुर्गमहर्षी' 'सह्याद्रीपुत्र' श्री. प्रमोद मारुती मांडे यांचं हे चरित्रं आपल्या हाती सोपवताना माझ्या मनात विलक्षण आनंद दाटून आला आहे. कै. मांडे सरांच्या निधनापूर्वी काही दिवस अगोदर मी स्वतःलाच दिलेल्या वचनपूर्तीचा हा आनंद आहे. एका जबाबदारीचे हे ओझे वाचकांच्या खांद्यावर देण्याचा हा आनंद आहे.

दि. १८ डिसेंबर १९५४ चा जन्म. जन्मदाखल्यावर जरी भुसावळ असले तरी जन्म मात्र पुण्याचाच. आणि कागदोपत्री जन्मतारीख १८ जुलै असली तरी ती फक्त शाळा प्रवेशासाठीची. वडील रेल्वेत नोकरीला. पानशेतच्या पुरानंतर वडीलांनी शाळेच्या सोईसाठी भुसावळला नेले. पुढे काही दिवस भुसावळ व नंतर पुन्हा मुक्काम 'पुणे'. कसेबसे शिक्षण आटोपून निरनिराळ्या नोकऱ्या करून अखेर श्रीयुत प्रमोद मांडे सर टाटा मोटर्स (टेल्को) मध्ये रुजू झाले. २२ वर्षे टेल्कोमध्ये नोकरी करताकरता शिवचरित्राची, इतिहासाची, निसर्गाची आणि गडकिल्ल्यांची आवड निर्माण झाली. क्रांतिकारकांच्या चरित्राने भुरळ घातली आणि त्यातून ४५० क्रांतिकारकांचे दुर्मिळ फोटो, त्याचे पेंटींग्स् तयार केले आणि 'आझादी के दिवाने' या क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे व माहितीचे प्रदर्शन उभे राहिले. त्यातूनच पुढे 'स्वातंत्र्य संग्रामातील समिधा', 'स्वातंत्र्य संग्रामातील अंगार' व 'स्वातंत्र्य संग्रामातील अग्निशलाका' या क्रांतिकारकांवरील ग्रंथांची निर्मिती झाली. अवांतर वाचनाच्या आवडीतून स्वतःचा १५००० पुस्तकांचा वैयक्तिक संग्रह निर्माण झाला. संपूर्ण भारतभराच्या भ्रमंतीमधून भटकंतीचे २ लाखाहून अधिक फोटो गोळा झाले. 'सह्याद्रीतील रत्नभांडार' आणि 'गड किल्ले महाराष्ट्राचे' या ग्रंथांची निर्मिती झाली. निरनिराळ्या व्याख्यानांना, कार्यक्रमांना जाऊन, अनेक थोरामोठ्यांशी हितगूज साधून आणि अनुभवांचा अर्क गोळा झाल्यानंतर स्वतः गडकिल्ल्यांवर, छत्रपती शिवाजी महाराजांवर व क्रांतिकारकांवर व्याख्याने देण्यास सुरुवात केली. त्यातून ३००० स्लाईडस् गोळा होऊन त्याद्वारे १००० हून अधिक स्लाईड शोज् आणि ५००० हून अधिक व्याख्याने महाराष्ट्रभर दिली गेली. गडकिल्ल्यांची व क्रांतिकारकांची २०० हून अधिक प्रदर्शने आयोजित केली गेली. आणि विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रवास केलेल्या 'राजगड ते आग्रा' आणि 'आग्रा ते राजगड' अशा ७ राज्यांतून जाणाऱ्या ६३०० कि.मी. चा २ वेळा प्रवास केला. आणि सर्वांत महत्त्वाचे स्वतः मात्र अत्यंत साधे आणि विनम्र राहून माझ्यासारखे असंख्य मित्र, अनुयायी, शिष्य गोळा केले. आणि १७ ऑक्टोबर २०१७ रोजी अत्यंत धीरोदत्तपणे या जगाचा निरोपही घेतला.

अशा या ६३ वर्षांच्या मांडे सरांच्या आयुष्याचा लेखाजोखा की जो इतस्ततः पसरलेला होता, तो मी माझ्या परीने एकत्र करून आज आपल्यासमोर मांडत आहे. आपण प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांना आणि त्यांच्या प्रेरणेने शत्रूंशी लढणाऱ्या अनेक शूरवीर मावळे व क्रांतिकारकांना पाहिलेले नाही. मात्र त्याच विचाराने कार्य करणाऱ्या श्री. प्रमोद मांडे सरांना मात्र आम्ही पाहिलेले आहे, अनुभवलेले आहे. मग त्यांचेच चरित्र आपण सर्वांना सांगावयास हवे. म्हणून हा अल्पसा प्रयत्न.

शरीरयष्टी सर्वसामान्य. डोक्यावर बारीक कुरुळे केस आणि साधा इन न केलेला शर्ट-पँट असा पेहराव. ट्रेकला मात्र बऱ्याचदा ट्रॅकसूटच. दाढी मात्र मूड असला तर करायची किंवा वेळ मिळाला तर. सावळा रंग. शर्टाच्या बाह्या वर घेतलेल्या आणि वरची एक किंवा कधीकधी दोन बटणे उघडलेली. ट्रॅकसूट असेल तर निम्म्यापर्यंत चैन उघडलेली. उन्हापावसात, डोंगरदऱ्यांत आयुष्य घालवल्यामुळे राकट झालेले शरीर. पायात साधी चप्पल. व्याख्यानाला जाताना मात्र आवर्जून स्पोर्ट शूज. मनगटावरील घड्याळ मात्र सर्वजण घालतात तसे न घालता मनगटाच्या विरुद्ध दिशेस घालायची सवय. एकमात्र वाईट्ट सवय होती, ती म्हणजे नेहमी ओढली जाणारी सिगारेट. प्रथमदर्शनी छाप पडावी असे त्यांच्या रंग-रुपात काहीच नव्हते. मी जेव्हापासून मांडे सरांना ओळखत आहे, तेव्हापासून त्यांच्या या रंगरुपात काहीएक बदल झालेला नाही. अपवाद मात्र त्यांच्या निधनापूर्वीचे तेवढे २ महिने. हा व्यक्ती म्हणजे एक सहस्त्रावधी लोकांवर प्रभाव टाकणारा फर्डा वक्ता आणि व्यासंगी अभ्यासक आहे हे त्यांचा साधेपणा पाहून कुणासही खरे वाटणार नाही.

कधिही उंची कपडे त्यांनी घेतली नाहीत. मा. दीपकजी पायगुडे यांच्या फुलगाव येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मिलीटरी शाळेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी मांडे सरांनी अंगावर घेतली. त्यामुळे नेहमीच शाळेत जावे लागे. तेथे अशी साधी राहणी कामाची नाही, अंगात कोट हवा. थोडीतरी चांगली कपडे हवी असा सततचा आग्रह केल्याने मा. पायगुडे साहेबांच्या आग्रहाखातर मला घेऊन मांडे सर कपडे खरेदीसाठी गेलो. बायकोनंतर पहिल्यांदा कुणीतरी आग्रह केला म्हणून मी कपडे घेतले, असेही मला वर त्यांनी सांगितले. असे आमचे हे मांडे सर. बाहेरील रंगरुपापेक्षा अंतर्मन कसे स्वच्छ आणि निर्मळ राहील, याच्यावर कटाक्ष जास्त.

मात्र त्यांच्या वाणीमध्ये एकप्रकारचा राकट आणि धारदारपणा होता. मिस्कीलपणा होता. हळूच चिमटे घेत, खुषमस्करी करीत, निरनिराळे किस्से-अनुभवांचे गाठोडे समोरच्या व्यक्तीसमोर दिलखुलासपणे रिते करीत मांडे सर समोरच्याच्या मनाचा ठाव घेत. तासन्‌तास आणि अगदी दिवसरात्र मित्रमंडळींमध्ये गप्पांची मैफील रंगवणे हा त्यांचा पिंड. हिप्नोटाईज केल्यासारखे समोरील लोक त्यांचे शब्दन्‌शब्द ऐकत असत.

काही लोकच अशी असतात की, त्यांच्या राहणीमानात कधी बदलच होत नाही. अशा मंडळींच्या अंगात कोणतीही कपडे घाला. कपड्याचा नूर पालटू शकतो, पण यांचा नाही. कपड्यामुळे त्यांच्या देहबोलीत आणि वाणीत काहीएक बदल होत नाही. अशी माणसाची एक जातकुळी असते आणि या जातकुळीचे ज्येष्ठ प्रतिनिधी म्हणजे 'प्रमोद मांडे'.

मांडे सर सर्व परिचतांमध्ये 'भाऊ' म्हणून सुपरिचित होते. मी मात्र मांडे सर किंवा सर असेच म्हणत आलो. त्यांचे व्यक्तिमत्व हे एका परिसाप्रमाणे होते, जे त्यांच्या सहवासात येतील त्यांना ते त्यांच्या विचारांनी मंत्रमुग्ध करीत. परंतु ३-४ पुस्तकांखेरीज आणि थोड्याबहुत लेखांशिवाय त्यांनी विपुल लेखन केले नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल. त्याचे कारण असे की, मांडे सर स्वतः फारसा वेळ हा गड-किल्ल्यांवर फिरण्यात आणि उरलेल्या वेळेत मित्रांमध्ये चर्चा करण्यात घालवित असत. त्यामुळे वेळात वेळ काढून काहीतरी वैचारिक लेखन करणे त्यांना शक्य झाले नसावे. सरांनी स्वतः जरी फारसे लेखन केले नसले तरी एक वैचारिक पिढी मात्र त्यांनी नक्कीच घडविली. नवविचारांचे एक वातावरण

निर्माण केले. त्यामुळे मांडे सर जरी गेलेले असले तरी हे विचार मात्र कधीच मावळणारे नाही.

इतिहास क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांची, अनेकांशी विविधप्रकारचे वाद-विवाद असतात. मनात असूया असते. मात्र मांडे सरांबद्दल असा विचार कोणाच्याही मनात नाही, याची मी खात्री देऊ शकतो. कारण की, वाद-विवाद असणाऱ्या दोन्ही गटांशी त्यांचे असणारे ऋणानुबंध.

मांडे सरांचा तसा राजकारणाशी फारसा संबंध आला नाही. मात्र सर्वच पक्षांमध्ये त्यांचे परिचित होते. शिवसेना पक्षाच्या उभारीच्या काळापासून त्यांना या पक्षाचे आकर्षण होते. पण जसजसे राजकारण स्वार्थकेंद्रित होत गेले तसतसे मांडे सर त्यापासून दूर गेले. मात्र अनेक गरीब व गरजूंना विविधप्रकारे मदत केल्याचे मी स्वतः पाहिले आहे. बायकोचे दागिने काही मित्रांना देऊन त्यांची आर्थिक गरज भागविली आहे.

मनाने अत्यंत खंबीर असलेले मांडे सरांना मी माझ्या आयुष्यात दोनदाच अत्यंत व्याकूळ झालेले पाहिले. एक म्हणजे शेवटच्या आजारपणात आणि कौटुंबिक दुःखद प्रसंगात. कुटुंबातील दुःखद प्रसंगी मांडे सरांना श्री. विजय गायकवाड, प्रा. सतिश वाघमारे, श्री. बाळासाहेब रूणवाल आणि त्यांच्या विपुल ग्रंथसंपदेने त्यांना मानसिक आधार दिला. शेवटच्या आजारपणात मात्र असंख्य जण आधाराला असूनही त्याचा उपयोग झाला नाही.

मांडे सरांबद्दल असे मी कितीतरी लिहू शकेन. स्वच्छ आणि निर्मळ मनासोबतच उज्वल ध्येयवाद असणाऱ्या विधायक व्यक्तींबद्दल खूपखूप लिहीले पाहिजे. मांडे सरांबाबतचे लेखन येथे थांबवतो. मात्र वाचकांना विनंती की, याच ग्रंथातील मी मांडे सरांवर लिहीलेला पान क्र. २४२ वरील लेख वाचावा. आणि आता या ग्रंथाबद्दलची पार्श्वभूमी सांगतो.

श्री. मांडे सरांच्या निधनानंतर भारतातील किल्ल्यांवरील 'फोर्टस् अँड पॅलेसेस इन इंडिया' हा ग्रंथ व क्रांतिकारकांवरील 'आझादी के दिवाने' हा ग्रंथ आम्ही पूर्णत्वास नेला. याशिवाय अन्य देखील काही उपक्रम पूर्ण केले. श्री. मांडे सरांनी लेखन फारसे केलेले नसले तरी जे काही लिहीलेले आहे ते लेख, कात्रणे, बातम्या, फोटोग्राफ्स् इत्यादी सर्व माहिती एकत्रितरित्या सर्वांपुढे येणे अत्यावश्यक असल्याने या ग्रंथाची जुळवाजुळव करीत होतो. त्यातून या ग्रंथाच्या पहिल्या भागात 'मांडे सरांनी लिहीलेले लेख' या भागात छोटे मोठे असे ३१ लेख, ग्रंथांमध्ये दिलेली मनोगते, प्रस्तावना इत्यादी समाविष्ट केलेले आहेत. या लेखांमध्ये त्यांच्या ग्रंथांमधील प्रस्तावना देखील मी आवर्जून घेतलेल्या आहेत. सह्याद्रीपुत्र, स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा, गड किल्ले महाराष्ट्राचे या ग्रंथांना मांडे सरांनी लिहीलेल्या प्रस्तावना वाचनीय आहेत. त्यामुळे आवर्जून प्रस्तुत ग्रंथामध्ये मी त्या समाविष्ट केलेल्या आहेत.

मांडे सरांनी विविध वृत्तपत्रांना, मासिकांना काही लेख स्व हस्तक्षरात लिहून दिले होते. ते त्यांच्या संग्रहात मला सापडले. त्यांच्या हाताने लिहीलेले लेख आहे असेच छापावे की पुन्हा टायपिंग करून असा प्रश्न माझ्यासमोर होता. मात्र मांडे सरांचे हस्ताक्षर मुळातच खूप सुंदर होते. आणि तेच पाहताना जास्त मजा येते आणि अक्षरातून त्या व्यक्तीचा स्वभाव आणि भावना देखील समजून येते. त्यामुळे जे लेख हस्तलिखीत होते ते आहे असेच प्रसिद्ध केले आहेत. मात्र जे प्रसिद्ध झालेले लेखाचे फोटो मिळाले, ते देखील आहे असेच प्रसिद्ध केले आहेत.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागात दि. ८ फेब्रुवारी २०१५ रोजीपासून ते दि. ७ जानेवारी २०१७ पर्यंतच्या शंभरहून अधिक फेसबुक या समाजमाध्यमावर लिहीलेल्या पोस्ट दिलेल्या आहेत. मांडे सरांच्या फेसबुक वरील पोस्ट तर एक माहितीपूर्ण व खुसखुशीत किश्यांची खाणच आहे. त्यातील काही पोस्ट वाचून सरांचा बेडर-निडर स्वभाव समजून येतो. काही पोस्टमधून तर त्यांनी रंगतच आणली आहे. २०१५-१६ मध्ये आलेल्या या पोस्ट काहींना चांगलेच वैचारिक खाद्य पुरवित होते. त्या त्या वेळच्या सामाजिक, ऐतिहासिक पार्श्वभूमीवर त्या लिहीण्यात आलेल्या होत्या. आजही त्या पोस्ट वाचताना, आपल्याला त्या त्या वेळची परिस्थिती देखील कळू शकते. वाचकांनी या सर्व माहितीपूर्ण पोस्ट/लेख नक्की वाचाव्यात.

ग्रंथाच्या तिसऱ्या भागात श्री. मांडे सरांच्या चरित्राची, स्वभावाची ओळख व्हावी यासाठी काही मान्यवरांचे लेख घेतलेले आहेत. याबाबत प्रा. सतीश वाघमारे यांचे करावे एवढे कौतुक कमीच आहे. मांडे सरांच्या हयातीतच वाघमारे सरांनी 'सह्याद्रीपुत्र प्रमोद मांडे' नावाचा ग्रंथ संपादीत करून त्यामध्ये ३९ मान्यवरांचे लेख प्रसिद्ध केले होते. त्यामधील काही लेख मी या ग्रंथात घेतलेले आहेत. त्यामुळे प्रा. सतीश वाघमारे सरांनी आम्हांवर केलेले अनंत उपकार स्मरुन ज्या ज्या मान्यवरांनी आपले लेख त्या ग्रंथासाठी दिले त्यांचेही आभार व्यक्त करतो. मांडे सरांचे पिताश्री श्री. मारुतीराव किसनराव मांडे यांचा लेख मांडे सरांचा परिचय करून देण्यासाठी फार उपयुक्त ठरतो. याशिवाय ज्येष्ठ इतिहास अभ्यासक श्री. निनाद बेडेकर, आमदार श्री. दीपक पायगुडे, प्रा. सतीश नारायण वाघमारे, ज्येष्ठ दुर्गअभ्यासक श्री. आनंद पाळंदे, ज्येष्ठ दुर्गअभ्यासक प्रा. प्र. के. घाणेकर, श्री. अनिकेत यादव, श्री. चेतन घाडगे, ज्येष्ठ विचारवंत श्री. हरी नरके, श्री. राहूल पापळ, ॲड. अमित शिवाजी गोगावले, प्रा. जी. एस. भोसले, श्री. संदीप भानुदास तापकीर, प्रा. रा. आ. कदम, मांडे सरांचे जुने सहकारी श्री. आनंदराव कृष्णराव शिंदे, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक श्री. इंद्रजित सावंत, ज्येष्ठ विचारवंत व लेखक डॉ. रमेश जाधव, दुर्ग अभ्यासक श्री. भगवानराव चिले, विचारवंत ॲड. राज कुलकर्णी, श्री. शंकरराव रावळे, लेखक श्री. मदहोश बिलग्रामी, शाहीर दादा पासलकर, श्री. रवी पार्वती शिवाजी मोरे, श्री. अमर साळुंखे उर्फ भाऊ मराठा यांचे लेख मांडे सरांचे अनेकविध पैलू आपणांस उलगडवून दाखवतील.

श्री. मांडे सरांची वृत्तपत्रात क्रांतिकारकांची लेखमाला प्रसिद्ध झाली होती. त्याची काही कात्रणे माझ्या संग्रही होती, ती या ग्रंथाच्या चौथ्या भागात दिली आहेत.

ग्रंथाच्या पाचव्या भागात विविध वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे दिलेली आहेत. खरे पाहता याच कात्रणांमुळे या ग्रंथाची फार पाने भरली आहेत. माझ्या पुढे प्रश्न होता की, ही कात्रणे सर्व घेऊ की नको? मात्र माझ्याकडील असलेली सर्व माहिती येथे देण्याच्या उद्देशाने मी सर्वच कात्रणे येथे दिलेली आहेत. आणि कोणा व्यक्तीस याचा भविष्यात विविध प्रकारे उपयोग होऊ शकतो, त्यांच्या इतरही कार्यास त्यामधून हातभार लागू शकतो. म्हणून मी सर्व कात्रणे येथे सर्वांना वाचता येतील अशा पद्धतीने दिली आहेत.

ग्रंथाच्या शेवटच्या सहाव्या भागात मी मांडे सरांचे विविध कार्यक्रमांमधील, प्रदर्शनांमधील, भ्रमंतीमधील फोटोग्राफ्स् दिलेले आहेत. स्वतःचे फोटो काढण्यास मांडे सर फारसे उत्सुक नसायचे. आणि त्यात माझ्या संग्रही जे काही

फोटो उपलब्ध झाले ते ते मी येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून हा चरित्रग्रंथ केवळ शाब्दिक नव्हे तर '**फोटो बायोग्राफी**' स्वरुपाचा झाला आहे.

ग्रंथाच्या निर्मितीसाठी मदत करणारी सौ. मानसी कानकाटे (वडके), ग्रंथाची आकर्षक मांडणी व मुखपृष्ठ साकारणारा माझा बालमित्र श्री. माणिक काळे, ग्रंथाचे प्रिंटींग तत्परतेने पूर्ण करणारे श्री. अरविंद वाविया व राधिका एंटरप्रायझेसचे सर्व कर्मचारी, माझी पत्नी सौ. अंजली, मुलगी अदिती, मुलगा अदिराज या सर्वांचा मी आभारी आहे. माझ्या सर्वच कार्यात कायम पाठिशी राहणारे श्री. राहूल पापळ, श्री. चेतन घाडगे, श्री. किरण सोनीवाल, श्री. मोहित झांजले, झुंजार शिलेदार सेवा संस्था, यशश्री ॲकॅडमी यांचा देखील मी ऋणी आहे.

इतस्ततः तुरळकपणे विखुरलेले त्यांचे छोटे-मोठे लेख मी काही प्रमाणात गोळा करू शकलो. त्यांची काही भाषणे गोळा करून ती यु-ट्युबवर टाकू शकलो. याचे मागे वळून पाहताना मलाच माझा अभिमान वाटतो. ही स्वस्तुती वाटेल, पण मला माझा राग देखील येतो. कारण मांडे सरांशी अनेक गहन विषयांवर मारलेल्या गप्पा, वैचारिक विवादांमधील त्यांचा मुद्दा या सर्व बाबी त्यावेळी रेकॉर्ड करणे, टिपून घेणे राहून गेले. याचे फार वाईट वाटते. असा कोणता विषय नाही की मांडे सरांनी त्यासंबंधीचे आपले अभ्यासपूर्ण मत व्यक्त केले असेल. एकदातर आम्हां सर्वांना मलमूत्र (संडास) यावर देखील गमतीशीर गोष्टी सांगून आश्चर्यचकित केल्याचे मला आठवते.

भारतीय दुर्गांचा, क्रांतिकारकांचा, इतिहासाचा एक फार मोठा अभ्यासक तसेच पुरोगामी विचारधारेचा पुरस्कर्ता समाजाने गमावलेला आहे याची जाणीव अनेकांना होणार नाही. अशा वेळी माझ्यासारखे त्यांचे शिष्य, अनुयायी यांनी त्यांच्यावर लिहीणे आवश्यक आहे. माझ्या या लेखनातून त्यांच्या वाचनाचा झपाटा, आकलनशक्ती, दांडगा व्यासंग याची खोली व व्याप्ती वाचकांना समजेलच असे नाही. मात्र या व्यक्तीची थोडीफार ओळख समाजास होईल. भाऊंच्या अचानक जाण्यामुळे माझी तर वैयक्तिक फार मोठी हानी झाली, कारण या वटवृक्षाच्या सावलीखाली आम्ही १०-१२ वर्षे निवांत पहुडलो होतो. आता हा वटवृक्षच उन्मळून पडल्यामुळे त्यावर बागडणाऱ्या, विहार करणाऱ्या आणि प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अवलंबून असणाऱ्या सर्वांचीच हानी झाली आहे. आणि केवळ यांचीच नाही तर संबंध महाराष्ट्राची, तेथील ऐतिहासिक, पुरोगामी व वैचारिक चळवळीचीच हानी झाली आहे. नानाविध विषयांचा गाढा व्यासंग असणारा, प्रखर बुद्धीवादी, चारित्र्यवान, संसारापेक्षा देशावर जास्त निष्ठा असणारा, मित्रांवर जीवापाड प्रेम करणारा, स्वहितापेक्षा समाजहित जपणारा एक पुरोगामी विचारवंत आपण गमावलेला आहे. एवढेच सांगून मी येथील लेखनास पूर्णविराम देतो.

**श्री. अनिकेत अंकुश यादव**

शिवशक ३५१, दि. १४ मे २०२५,

छत्रपती संभाजी महाराज जन्मदिन

# अनुक्रम


**भाग १**

**श्री. प्रमोद मांडे सरांनी लिहीलेले लेख १**

आम्ही (बि)घडलो २
आपला महाराष्ट्र ११
भुलेश्वर ही मंगल दौलत १३
चला पाऊस झेलायला १७
सरस ते सूर १९
गिरीचे मस्तकी गंगा २४
धबाबा लोटती धारा २६
इतिहासाची साक्ष : पुणे २७
साजावींझा (कुकडेश्वर) २९
कुंजरगडाला गवसणी ३०
ऐसा राजा होणे नाही ! ३२
भुलेश्वर ३६
हरिश्चंद्रगड ३७
सुंदरमठ ३९
मर्दानी दुर्गाच्या माथ्यावर ४१
शिरपुंजाचा भैरवगड ४४
न जाणो पुन्हा... ४६
सह्याद्रीच्या कुशीत ५१
सह्याद्रीच्या कुशीत (लेख क्र. २) ५४
किल्ले चंद्रपूर ५६
किल्ले जंजिरा ५७
किल्ले कर्नाळा ५८
किल्ले कोरलाई ५९
किल्ले राजगड ६०
किल्ले शिवनेरी ६१
सोलापूरचा भुईकोट किल्ला ६२
किल्ले तिकोना ६३
विजयदुर्ग ६४
किल्ले विशाळगड ६५
किल्ले कोरलाई ६६
दुर्ग तळा ७०
'स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा' ची अर्पणपत्रिका ७४
कुठे गेले असतील ते दिवस...
('सह्याद्रीपुत्र' या ग्रंथातील मनोगत) ७५
'स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा' या ग्रंथाच्या
पहिल्या आवृत्तीमधील मनोगत ९२
'स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा' या ग्रंथाच्या
दुसऱ्या आवृत्तीमधील मनोगत ९७
'स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा' या ग्रंथाच्या
तिसऱ्या आवृत्तीमधील मनोगत ९८
'स्वातंत्र्यसंग्रामातील अंगार' मधील मनोगत १०४
'स्वातंत्र्यसंग्रामातील अग्निशलाका'
मधील मनोगत १०५
या निमित्ताने...
('गड किल्ले महाराष्ट्राचे' या ग्रंथातील मनोगत) १०६
'दुर्गांच्या देशा' या ग्रंथातील प्रस्तावना ११७

**भाग २**

**श्री. मांडे सरांनी लिहीलेल्या फेसबुक पोस्ट १२१**

## ✻ भाग ३ ✻

**मान्यवरांचे लेख** २१६
- श्री. मारुतीराव किसनराव मांडे २१७
- श्री. निनाद बेडेकर २२१
- श्री. दीपक पायगुडे २२४
- श्री. सतीश नारायण वाघमारे २२९
- श्री. आनंद पाळंदे २३६
- श्री. प्र. के. घाणेकर २३९
- श्री. अनिकेत यादव २४२
- श्री. चेतन घाडगे २५९
- श्री. हरी नरके २६२
- श्री. राहूल पापळ २६३
- श्री. ॲड. अमित शिवाजी गोगावले २६६
- श्री. जी. एस. भोसले २६९
- श्री. जी. एस. भोसले २७३
- श्री. संदीप भानुदास तापकीर २७५
- श्री. रा. आ. कदम २८०
- श्री. आनंदराव कृष्णराव शिंदे २८४
- श्री. इंद्रजित सावंत २८६
- श्री. डॉ. रमेश जाधव २८९
- श्री. भगवानराव चिले २९४
- श्री. ॲड. राज कुलकर्णी २९७
- श्री. शंकरराव रावळे ३००
- श्री. मदहोश बिलग्रामी ३०३
- श्री. शाहीर दादा पासलकर ३०५
- श्री. शाहीर दादा पासलकर ३०८
- श्री. रवी पार्वती शिवाजी मोरे ३१०
- श्री. अमर साळुंखे उर्फ भाऊ मराठा ३१२

## ✻ भाग ४ ✻

**वृत्तपत्रांमधील कात्रणे** ३१५

(विविध वृत्तपत्रांसाठी मांडे सरांनी लिहीलेले लेख)

## ✻ भाग ५ ✻

**बातम्यांची कात्रणे** ३३५

(श्री. मांडे सरांची व्याख्याने, प्रदर्शने इ. च्या विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांची कात्रणे)

**प्रमोद मांडे यांची ग्रंथसंपदा** ५८६

## ✻ भाग ६ ✻

**छायाचित्रे** ५९०

(विविध कार्यक्रम, फोटो प्रदर्शन, भ्रमंती मधील काही क्षणचित्रे)

**श्री. मांडे सरांचा व संपादकाचा परिचय** ६७५


**श्री. प्रमोद मांडे यांची Youtube वरील भाषणे ऐकण्यासाठी हा QR कोड स्कॅन करा.**

# समग्र प्रमोद मांडे

संपादक : श्री. अनिकेत अंकुश यादव




'दुर्गमहर्षी', 'सह्याद्रीपुत्र'

## श्री. प्रमोद मारुती मांडे

यांचा जीवनपट उलगडणारा ग्रंथ...

या ग्रंथामधील समाविष्ट बाबी :

* रंगीत आणि कृष्णधवल अशा २ प्रकारांत उपलब्ध.
* साईज – लेटर (८.५' बाय ११') । ७०० पाने । पुठ्ठा बायंडींग (हार्ड बाऊंड)
* १५०+ श्री. मांडे यांनी लिहीलेले छोटे/मोठे लेख.
* २४ चरित्रात्मक लेख.
* ५००+ वृत्तपत्रात आलेल्या बातम्या/लेख/कात्रणे.
* १०००+ प्रदर्शने व विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रे.

---

संपर्क :– श्री. अनिकेत यादव, ४१७, शुक्रवार पेठ, शिवाजी रोड, खडक पोलीस स्टेशन समोर, पुणे ४११००२. मोबा. 7588291483

## – परिचय पत्र –

| | | |
|---|---|---|
| नाव | – | प्रमोद मारुती मांडे |
| पत्ता | – | धनकवडी, पुणे – ४११ ०४३. |
| जन्म | – | १८ डिसेंबर १९५४, पुणे. |
| मृत्यू | – | १७ ऑक्टोबर २०१७, पुणे. |
| नोकरी | – | टाटा मोटर्स, पुणे येथे २२ वर्षे सेवा, १ सप्टेंबर २००० पासून स्वेच्छानिवृत्ती. |
| छंद | – | सह्याद्रीमध्ये ४० वर्षे पदभ्रमण, फोटोग्राफी, वाचन, लेखन, अंदाजे २००० किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट. |
| संग्रह | – | १५००० पुस्तकांचा व्यक्तीगत संग्रह, ३००० स्लाईड्स व २,००,००० हून अधिक भटकंतीचे फोटो, ४५० क्रांतिकारकांचे दुर्मिळ फोटो व तैलचित्रे |
| संबंधित संस्था | – | (१) पुणे व्हेंचरर्स, (२) श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, (३) वडवानल प्रतिष्ठान, (४) भारत इतिहास संशोधक मंडळ, (५) लोकसेवा ट्रेकिंग अकादमी, (६) गड किल्ले सेवा समिती इ. |
| लेखन (पुस्तके) | – | फोर्टस् अँड पॅलेसेस इन इंडिया, गड किल्ले महाराष्ट्राचे, सह्याद्रीतील रत्नभांडार, स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा, स्वातंत्र्यसंग्रामातील अंगार, स्वातंत्र्यसंग्रामातील अग्निशलाका. १११ क्रांतीकारकांचे संक्षिप्त चरित्र मराठी, इंग्रजी, गुजराथी व कन्नड भाषेत प्रकाशित झाले आहे. तसेच महान्यूज, लोकराज्य, पुणे परिचय व अनेक वृत्तपत्र, नियतकालिकांमधून लेखन. |
| स्लाईड शोज् | – | महाराष्ट्रातील व इतर राज्यांमधील किल्ल्यांचे १००० च्या वर स्लाईड शोज् शैक्षणिक संस्था व इतर संस्थांमध्ये केलेले आहेत. |
| व्याख्यान | – | कथा क्रांतिकारकांच्या, कथा व व्यथा क्रांतिकारकांच्या, महाराष्ट्रातील किल्ले, परिचित व अपरिचित शिवाजी महाराज, शिवरायांची आग्रा मोहिम या व अशा अनेकविध विषयांवर अनेक ठिकाणी ५००० हून अधिक व्याख्याने. |
| प्रदर्शने | – | आझादी के दिवाने (क्रांतिकारकांच्या जीवनावरील प्रदर्शन), सह्याद्रीतील रत्नभांडार (किल्ले, मंदिरे, लेणी इत्यादींच्या फोटोंचे प्रदर्शन) हेरिटेज फोर्टस् ऑफ इंडिया (भारतातील किल्ल्यांचे व वास्तूंचे भव्य प्रदर्शन) महाराष्ट्रात व इतर राज्यांत २०० हून अधिक प्रदर्शने |
| विशेष | – | छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रवास केलेल्या राजगड ते आग्रा व आग्रा ते राजगड अशा ७ राज्यांतून जाणाऱ्या ६३०० कि.मी. मार्गावरुन २ वेळा प्रवास करुन या ऐतिहासिक मार्गाचे संशोधन व चित्रीकरण केलेले आहे. |

# – परिचय –

**नाव** – श्री. अनिकेत अंकुश यादव

**मोबाईल** – ७५८८२९१४८३, ९८२२७४३२४४.

**ई–मेल** – aniketyadav84@gmail.com

**निवास** – १३१२, सदाशिव पेठ, अजिता सोसायटी,
भारत इतिहास संशोधक मंडळासमोर, पुणे ४११०३०.

**जन्म** – दि. ९ ऑगस्ट १९८४, पुणे. **शिक्षण** – बी.कॉम.

**व्यवसाय** – लिगल ॲडव्हायझर, कॉम्प्युटर टायपिंग (पत्ता–४१७, शुक्रवार पेठ, पुणे २)

**छंद** – ऐतिहासिक स्थळांची भटकंती, वाचन, लेखन, फोटोग्राफी इ.

**लेखन** – ✻ **Forts and Palaces in India : Encyclopedia of 4000+ Forts & Palaces across India** या दुर्गकोषाचे लेखन.




**<u>या ग्रंथामधील समाविष्ट बाबी</u>** :

- साईज ८.५'×११' । ७५० पाने । हार्डबाऊंड.
- २६ राज्ये, ६ केंद्रशासित प्रदेश, ५२१ जिल्ह्यांमधील ४०८८ किल्ल्यांचा समावेश.
- १२८२ रंगीत छायाचित्रे, ३३ नकाशे.
- सर्व राज्यांसह भारताचे भौगोलिक वर्णन.
- किल्ल्यांचे अक्षांश, रेखांश व समुद्रसपाटीपासूनची उंची.
- जिल्ह्याच्या मुख्यालयापासून किल्ल्याचे अंतर व दिशा.
- किल्ल्याची थोडक्यात माहिती, त्यावरील वास्तू व त्याचा थोडक्यात इतिहास.
- किल्ल्याच्या जवळपासची तसेच जिल्ह्यामधील प्रेक्षणीय ठिकाणे.
- ऋग्वेद, मनुस्मृती, पुराणे, रामायण, महाभारत, कौटिल्य रचित अर्थशास्त्र या व अशा विविध ४३ हून अधिक प्राचीन ग्रंथांमध्ये असलेल्या किल्ल्यांबाबतची माहिती.

✻ आझादी के दिवाने या ४००० क्रांतिकारकांची माहिती असलेल्या ग्रंथाचे संपादन

**<u>या ग्रंथात समाविष्ट असणाऱ्या प्रमुख बाबी</u>** :

- पृष्ठसंख्या - ४७६, रंगीत पाने - १२.
- १४६ क्रांतिकारकांच्या प्रकाशचित्रांसह रोमहर्षक माहिती
- ८००+ स्वातंत्र्यसैनिकांची छायाचित्रे
- ४०००+ क्रांतिकारकांची वर्णानुक्रमानुसार यादी
- माहितीपूर्ण परिशिष्टे




✻ **समग्र प्रमोद मांडे** या ग्रंथाचे संपादन
(दुर्गमहर्षी प्रमोद मांडे यांचा जीवनप्रवास उलगडणारा ग्रंथ)
**समाविष्ट बाबी** : ● साईज ८.५'×११' । ७०० पाने । हार्डबाऊंड.
● १५०+ श्री. मांडे सरांचे लेख. ● २४ चरित्रात्मक लेख.
● ५००+ वृत्तपत्रातील बातम्या/कात्रणे. ● १०००+ छायाचित्रे




✻ **डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ** या ग्रंथाचे संपादन
(तीन आवृत्या प्रसिद्ध) **समाविष्ट बाबी** : ● पृष्ठसंख्या - ३७५
● डॉ. पिसुर्लेकरांवरील ४ चरित्रात्मक लेख व त्यांची दुर्मिळ चित्रे.
● डॉ. पिसुर्लेकरांचे २२ दुर्मिळ लेख व त्यांच्या १३९ ग्रंथांचा व लेखांचा सारांश.

✻ **श्रीशिवछत्रपतींची आरमारी मोहीम–बसरूर** या संशोधनात्मक पुस्तकाचे लेखन **(या ग्रंथाच्या नवीन आवृत्तीचे काम सुरु)**

✻ वृत्तपत्रे, दिवाळी अंक व मासिकांमधून लेखन

**व्याख्याने** – ✻ **मराठ्यांचे आरमार** ✻ **बसरूर मोहीम**
✻ **शिवचरित्रातून काय शिकावे ?**
✻ **आझादी के दिवाने (गाथा अज्ञात क्रांतिकारकांची)** ✻ **भूगोल मोजणारी माणसे**
✻ **तुम्हांला श्रीमंत व्हायचंय का ?** ✻ **दर्शन देवभूमीचे (चारधाम यात्रेवर आधारीत)**
✻ **सामान्य व्यक्तींचे असामान्य कर्तृत्व** इ. विषयांवर महाराष्ट्रभर व्याख्याने.
**क्रांतिकारकांच्या फोटो व माहितीच्या प्रदर्शनाचे महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आयोजन.**

**विशेष** – ✻ आई–वडीलांचे छत्र हरपल्यानंतर पुढील शिक्षण पूर्ण केले. कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलत, छ. शिवरायांपासून प्रेरणा घेऊन वयाच्या **१८ व्या वर्षी (७ ऑक्टो. २००२) स्वतःच्या कॉम्प्युटर टायपिंग या व्यवसायाची सुरुवात.**

✻ **शिवरायांची पहिली आरमारी मोहीम – 'बसरूर' या मोहीमेमुळे प्रभावित.**

✻ २४ ऑक्टोबर १६५७ रोजी छ. शिवाजी महाराजांनी आरमाराची मुहूर्तमेढ रोवली. त्याचे स्मरण रहावे म्हणून **२४ ऑक्टोबर** हा दिवस **'मराठा आरमार दिन'** म्हणून साजरा व्हावा यासाठी जनजागृती केली.

✻ **डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ** या ग्रंथास डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते पुरस्कार.

✻ **Forts and Palaces in India** व **आझादी के दिवाने** या ग्रंथांचा जगभरातील विविध मान्यवर, विचारवंत व वृत्तपत्रांकडून गौरव.

✻ भारत इतिहास संशोधक मंडळ, रोटरी क्लब इ. संस्थांकडून पुरस्कार.

✻ मराठ्यांच्या युद्धकौशल्यावर आधारीत **लाईट अँड साऊंड शो**चे आयोजन.

✻ शिवरायांच्या ३५० व्या राजाभिषेक दिनानिमित्ताने सर्वत्र **शिवशक** लिहीण्याचे आवाहन केले.

✻ किल्ले व पुरातन वास्तूंच्या संवर्धनासाठी सतत प्रयत्नशील.

# समग्र प्रमोद मांडे

## संपादक : श्री. अनिकेत अंकुश यादव




‘दुर्गमहर्षी’, ‘सह्याद्रीपुत्र’

## श्री. प्रमोद मारुती मांडे

यांचा जीवनपट उलगडणारा ग्रंथ...

**या ग्रंथामधील समाविष्ट बाबी :**

* रंगीत आणि कृष्णधवल अशा २ प्रकारांत उपलब्ध.
* साईज – लेटर (८.५’ बाय ११’) । ७०० पाने । पुठ्ठा बायंडींग (हार्ड बाऊंड)
* १५०+ श्री. मांडे यांनी लिहीलेले छोटे/मोठे लेख.
* २४ चरित्रात्मक लेख.
* ५००+ वृत्तपत्रात आलेल्या बातम्या/लेख/कात्रणे.
* १०००+ प्रदर्शने व विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रे.

---

संपर्क :– श्री. अनिकेत यादव, ४१७, शुक्रवार पेठ, शिवाजी रोड, खडक पोलीस स्टेशन समोर, पुणे ४११००२. मोबा. 7588291483